श्री. दिपक ज्ञानेश्वर माळोदे यांचे प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.३८१७/२०१६ मध्ये, दि.२०/०६/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने त्यांच्याकरीता दि.०१/०६/२०१२ पासून १ अधिसंख्य वनमजूराचे पद निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एस-३०/२०२६/१११/प्र.क्र.२०/वने-१२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १५ जुलै, २०२६.

वाचा :- १) मा. कामगार न्यायालय, अमरावती यांचा युएलपी क्र.७७/१९९३ मधील दि.२०/०८/२००४ चा न्याय निर्णय.
२) मा. औद्योगिक न्यायालय, अमरावती यांचा युएलपी क्र.७८/२००४ मधील दि.२०/०९/२००४ चा न्याय निर्णय.
३) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचा रिट याचिका क्र.४५०१/२००४ मधील दि.०९/०१/२००७ चा न्याय निर्णय.
४) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचा एलपीए क्र.१३३/२००७ मधील दि.०९/०१/२००८ चा न्याय निर्णय.
५) मा. औद्योगिक न्यायालय, अमरावती यांचा युएलपी क्र.३६/२०१३ मधील दि.०३/०३/२०१६ चा न्याय निर्णय.
६) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचा रिट याचिका क्र.३८१७/२०१६ मधील दि.२०/०६/२०२५ चा न्याय निर्णय.
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-विधी/३१/७(२)/आस्था-३/वम/प्र.क्र.६(१३-१४)/१०५०/२५-२६, दि.०९/०२/२०२६.
८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३१ /(७)विधी/वम/प्र.क्र.०६(१३-१४)/१२०१/२५-२६, दि.२४/०३/२०२६.
९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३१ /(७)विधी/वम/प्र.क्र.०६(१३-१४)/१८१/२५-२६, दि.१८/०५/२०२६.
१०) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.वेतन-१०१८/प्र.क्र.३४/सेवा-३, दि.१७/०८/२०२३.

प्रस्तावना :-

श्री. दिपक माळोदे दि.०४/०२/१९९० ते दि.३०/११/१९९२ या कालावधीत रोजंदारी मजुर म्हणून कार्यरत होते. दि.३०/११/१९९२ रोजी श्री. माळोदे यांची सेवा समाप्त करण्यात आली. सेवा समाप्त केल्याने श्री. माळोदे यांनी मा. कामगार न्यायालय, अमरावती येथे युएलपी क्र.७७/१९९३ दाखल केली. मा. कामगार न्यायालयाने दि.०१/०४/१९९३ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाव्दारे श्री. माळोदे यांना कामावर परत घेण्यात आले असून दि.२०/०८/२००४ रोजी सदर तक्रार फेटाळण्यात आली. सदरहू आदेशाविरुध्द श्री. माळोदे यांनी मा. औद्योगिक न्यायालय, अमरावती येथे युएलपी

क्र.७८/२००४ दाखल केली असून सदरहू युएलपी मा. न्यायालयाने दि.२०/०९/२००४ रोजी फेटाळली. सदरहू आदेशाविरुध्द श्री. माळोदे यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.४५०१/२००४ दाखल केली. सदरहू याचिका मा.न्यायालयाने दि.०९/०१/२००७ रोजी खारीज केली. तद्नंतर श्री. माळोदे यांना दि.२७/०२/२००८ रोजी कामावरुन कमी करण्यात आले. तद्नंतर, श्री. माळोदे यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे एलपीए क्र.१३३/२००७ दाखल केली. सदर याचिका दि.०९/०१/२००८ च्या आदेशान्वये खारीज केली असून, भविष्यामध्ये रोजंदारी मजूरांना नियमित करण्याबाबत शासनाने धोरण आखल्यास व त्या धोरणानुसार श्री. माळोदे पात्र ठरल्यास त्यांना शासन सेवेत नियमित करण्याबाबतचा विचार व्हावा असे निरीक्षण मा. उच्च न्यायालयाने नोंदविले आहे.

२. शासन निर्णय दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार शासन सेवेत दि.०१/०६/२०१२ पासून नियमित करुन अनुषंगिक लाभ मिळणेबाबत श्री. माळोदे यांनी मा. औद्योगिक न्यायालय, अमरावती येथे तक्रार युएलपी क्र.३६/२०१३ दाखल केली असून सदर तक्रार मा. न्यायालयाने दि.०३/०३/२०१६ रोजी खारीज केली. सदरहू निर्णयाविरुध्द श्री. माळोदे यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.३८१७/२०१६ दाखल केली. सदर प्रकरणी श्री.माळोदे यांच्याकडून शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतूदींची सकृतदर्शनी पूर्तता होत असल्याने त्यासंदर्भात श्री. माळोदे यांनी शासनास सादर केलेल्या निवेदनावर ३ महिन्याच्या कालावधीत योग्य तो निर्णय घ्यावा, असे अंतिम आदेश मा. उच्च न्यायालयाने दि.२०/०६/२०२५ रोजी पारीत केले.

३. प्रस्तुत प्रकरणी, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या रिट याचिका क्र.३८१७/२०१६ मधील दि.२०/०६/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने, श्री. दिपक ज्ञानेश्वर माळोदे यांना कायम करण्याबाबतचा प्रस्ताव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांनी त्यांच्या दि.०९/०२/२०२६, दि.२४/०३/२०२६ व दि.१८/०५/२०२६ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

४. त्यानुषंगाने, प्रस्तुत प्रकरणी, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.३८१७/२०१६ मध्ये, दि.२०/०६/२०२५ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने, श्री. दिपक ज्ञानेश्वर माळोदे, रोजंदारी मजूर यांचेकरीता शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार, त्यांच्याकरीता दि.०१/०६/२०१२ पासून एक अधिसंख्य पद निर्माण करुन त्यांच्या वेतनापोटी येणाऱ्या अंदाजित रु.१४,५५,०१०/- इतका खर्चास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.३८१७/२०१६ मध्ये, दि.२०/०६/२०२५ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने, श्री. दिपक ज्ञानेश्वर माळोदे, रोजंदारी मजूर यांचेकरीता शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार, त्यांच्याकरीता दि.०१/०६/२०१२ पासून ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दि.३१/०५/२०३० अथवा सदर पद रिक्त होईल यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंतच्या कालावधीसाठी रोजंदारी मजूर या संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्यास व सदर पदाच्या वेतनाकरीता येणाऱ्या अंदाजे रु.१४,५५,०१०/- (अक्षरी रुपये चौदा लाख पंचाव्वन हजार दहा फक्त) इतकी रक्कम मागणी क्र. सी ७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन १०१ वनसंधारण व विकास १०१ (१२) वन मजुरांच्या अधिसंख्य पदांची निर्मिती (२४०६-१८९८) "०१-वेतन" या लेखाशिर्षांतर्गत त्यांच्या वेतनाचा खर्च भागविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

२.	श्री. दिपक ज्ञानेश्वर माळोदे हे हा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर अधिसंख्य वनमजूर या पदाचा कार्यभार ज्या तारखेस स्विकारतील त्या तारखेपासून त्यांना अदा करावयाच्या रक्कमेची अचूक परिगणना करावी व त्यानुसार त्यांना दरमहा वेतनाची रक्कम त्यांची उपस्थिती व वर्तणूक पाहून अदा केली जाईल याची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांच्या कार्यालयाची राहील. तसेच वाचा येथील अ.क्र.०८, वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१७/०८/२०२३ मधील मागदर्शक तत्वाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

३.	उक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन, १०१ वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, (१२) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती, (१२) (०१) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती (अनिवार्य), (२४०६-१८९८) ०१-वेतन या लेखाशिर्षातंर्गत सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४.	सदरचा शासन निर्णय, वित्त विभाग, अनौ.संदर्भ क्र.४८८/व्यय-१०, दि.०९/०७/२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र.१७७/आपुक, दि.१४/०७/२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०७१५१७००४९२९४० असा आहे. सदरचा शासन निर्णय डिटीजल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHAGWAN MARUTI SAWANT

Digitally signed by BHAGWAN MARUTI SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=8EE89EB0AEC64F8BC0BDF8D85DDB4706D35ABD8B73C618E114EE98D5C9ECF57B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C7DBA1C6B5F7AB2A6CABC4F7EAD8CFA74F8F7A0FADCAC76D8F1CF22569F16BD3, cn=BHAGWAN MARUTI SAWANT
Date: 2026.07.15 18:20:16 +05'30'

(भगवान सावंत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती.
६) उपवनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती वनविभाग, अमरावती.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
८) कार्यासन अधिकारी (व्यय-१० / आपुक), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कार्यासन अधिकारी (ब-१ / वने-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती (वने-१२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.